CMYK

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सॉफ्ट स्किल खूप महत्त्वाची वाटते >> पान 2

मेहकर येथील औद्योगिक क्षेत्राला आगामी काळात सोनेरी दिवस >> पान 3

सत्ताधाऱ्यांना वठणीवर आणण्याचे काम न्यायव्यवस्थाच करु शकते >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



शूटिंग सुरु अन् अभिनेत्याने स्मिता पाटीलच्या धोबाडीत दिली, सेटवर ढसाढसा रडली अभिनेत्री
आतील पान

**सुविचार**
आयुष्यात चांगले मित्र हिच खरं संपत्ती आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 118 ■ रविवार, दि. 08 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# विधानसभा पराभवानंतर आता 'मविआ'चं भविष्य काय?

## शरद पवारांनी सांगितली पुढची रणनीती

**मुंबई/प्रतिनिधी : विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं. मात्र, महाविकास आघाडीला पराभवाचा मोठा धक्का बसला. महायुतीला मिळालेल्या बहुमतानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. तसेच अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सरकार स्थापन झालं असलं तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार बाकी आहे. दरम्यान, दुसरीकडे महाविकास आघाडीला विधानसभेच्या निवडणुकीत आलेल्या अपयशानंतर आघाडीतील नेत्यांकडून पराभवाची कारणं काय? यावर विचारमंथन करण्यात येत आहे.**



यातच विधानसभेच्या निवडणुकीत आलेल्या अपयशामुळे महाविकास आघाडीचं भविष्य काय? असा सवाल सत्ताधाऱ्यांकडून अनेकदा विचारला जातो. यातच आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महाविकास आघाडी एकत्र लढणार की स्वतंत्र? याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत. आता यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी महाविकास आघाडीची पुढील रणनीती काय असेल? यावर भाष्य केलं आहे.

विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीला अपयश आलं. आता पुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत आहेत. मग आता पुढच्या काळात महाविकास आघाडीची रणनीती काय असेल? असा प्रश्न पत्रकार परिषदेत शरद पवार यांना विचारला असता ते म्हणाले की, आम्ही सर्व एकत्रित आगामी निवडणुकीला सामोरं जाणार आहोत. निवडणुकीत जय आणि पराजय होत असतात, त्यामुळे ना उमेद व्हायचं नसतं. मी आयुष्यात १४ निवडणुका लढलो. मी कधी पराभव पाहिला नाही. मात्र, या निवडणुकीत राज्यात आम्हाला पराभव पाहायला मिळाला. जरी पराभव झाला असला तरी त्याची चिंता करायची नाही. लोकांमध्ये जायचं आणि काम करायचं. आज लोक देखील अस्वस्थ असल्याचं दिसंत. लोकांमध्ये उत्साह दिसत नाही. कारण निवडणुका झाल्यानंतर एक वातावरण असतं ते वातावरण महाराष्ट्रात दिसत नाही, असं शरद पवार म्हणाले.

ईव्हीएमवर आमची शंका नाही. कारण त्यासंबंधी ठोस असे पुरावे माझ्या हातात नाहीत. पण मतदानाच्या आकडेवारीवरून काही प्रश्न निर्माण होत आहेत. काँग्रेस पक्षाला ८० लाख मते पडली आणि त्यांचे फक्त १६ आमदार निवडून आले. तर शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मते मिळाली आहेत, तर त्यांचे ५७ आमदार निवडून आले आहेत. म्हणजे एक लाख कमी मतदान मिळूनही जवळपास ४१ आमदार अधिक निवडून आले आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची मते ७२ लाख आहेत. पण आमदार निवडून आले फक्त १० आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला ५८ लाख एवढे मतदान मिळाले, पण त्यांचे ४१ आमदार निवडून आले आहेत.

# नेतृत्वहीन बांगलादेशाला माफियांचा विळखा : ममता बॅनर्जी



कोलकाता : पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शुक्रवार, दि. ६ डिसेंबर रोजी बांगलादेशातील अशांततेबाबत चिंता व्यक्त केली आहे. माफियांच्या वाढीमुळे आणि कमकुवत प्रशासनामुळे बांगलादेश नेतृत्वहीन असल्याचे त्यांनी म्हटले आहे. बांगलादेशातील तुरुंगात अटकेत असलेल्या ६९ बंगाली मच्छिमारांच्या दुरावस्थेवर बोलताना त्यांनी भारताच्या केंद्र सरकारला हस्तक्षेप करून बांगलादेशमध्ये शांतता आणि स्थिरता सुनिश्चित करण्याची विनंती केली आहे.

जेव्हा त्यांना बंगालला बांगलादेशाकडून रोषाचा सामना करावा लागत आहे त्याबद्दल विचारले असता, लवकरच इतर राज्यांना देखील याचा फटका बसेल. जर कोणी बंगालच्या सीमेवर अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला, तर माफ केले जाणार नाही, अगदी बिहार आणि ओडिशालाही . त्यामुळे सर्वच शेजाऱ्यांनी आमच्यासोबत शांततेने राहावे असे मला वाटते, असे त्या म्हणाल्या.

बांगलादेशमधील सध्याच्या घडामोडी पाहता केंद्र सरकारने संयुक्त राष्ट्रांकडे (यूएन) बांगलादेशात शांतिसेना (पीसकीपिंग मिशन) तैनात करण्याची विनंती करावी, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तेथे छळ होणाऱ्या भारतीयांना परत आणण्यासंबंधी हस्तक्षेप करावा,' अशी मागणी ममता बॅनर्जी यांनी केली होती.

# 'मुस्लिम मतांसाठी' काँग्रेसने गिळले मूग; बांगलादेशविरोधात चकार शब्द नाही, मायावतींचा आरोप



लखनऊ : बांगलादेशात हिंदू, दलित, अल्पसंख्यांकांवर अन्याय होताना दिसून येत आहे. बहुजन समाज पार्टीच्या प्रमुख मायावती यांनी बांगलादेशी हिंदूंच्या सुरक्षेविषयी चिंता व्यक्त केली आहे. या सर्व परिस्थितीत 'मुस्लिम मतांसाठी' काँग्रेस गप्प असल्याचा आरोप मायावतींनी केला आहे. शेजारच्या देशात एवढं तणावजन्य वातावरण असतानाही काँग्रेस (उेपसीर्शीी ) केवळ मुस्लिम मतांकडेच आपले लक्ष केंद्रित करीत आहे यातून त्यांनी काँग्रेसचा स्वार्थीपणा समोर आणून जनतेला जागरुक ठेवण्याचा प्रयत्न केला.

मायावती यांनी काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि त्यांचे समर्थक हे एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याचे स्पष्ट शब्दात सांगितले. पुढे त्या म्हणाल्या की, या पक्षांनी देशातील सामाजिक आणि राजकीय संरचनेचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. या सर्व परिस्थितीत मायावती यांनी केंद्र सरकारला आपल्या कर्तव्याचे पालन करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरुन बांगलादेशी दलित व अल्पसंख्यांकांना अजून नुकसान झेलावे लागू नये. बांगलादेशातील पिडीत हिंदू, दलित व अल्पसंख्यांकांना योग्य ती सामंजस्याची बोलणी करुन भारतात परत आणण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे. काँग्रेसने याआधी ज्या चुका केल्यात त्याचाच परिणाम म्हणजे बांगलादेशात दलित व अल्पसंख्यांकांना होणारा त्रास असल्याचेही मायावती यांनी म्हटले आहे.

# पहाटच्या धुक्याने काश्मिरची अनुभूती

## धुक्याने पसरली सर्वत्र चादर मनला भूरळ घालणारी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** पहाटची गुलाबी थंडी, मनाला खुणवारा निसर्गरम्य परिसर आणि सर्वत्र पसरलेली धुक्याची चादर अशा सोळा श्रृंगार करून नटलेला परिसर काश्मिरची अनुभूती देत सर्वांना आपल्याकडे खुणावत भूरळ घालणारा परिसर जणू काश्मिरची अनुभूती उमरखेड तालुक्यात ढाणकी येथील निसर्गरम्य परिरसर देऊन जात होता.



उमरखेड तालुक्यातील ढाकणी परिसरात पहाटे पहाटेची मस्त गुलाबी थंडी आणि त्यामध्ये बर्फ सारखे दिसणाऱ्या धुक्याने सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. पाहाटे सर्वत्र धुक्याची पसरली चादर निर्सगाच्या सौंर्दयाची कश्मीर सारख्या थंड ठिकाणी असल्यासारखे भासत असल्याचे चित्र ढाणकी शहरामध्ये जाणवत होते.यासोबतच हवामान बदल होऊन लोकांना थंडी जाणवू लागली आहे. यामुळे लोकांमध्ये एकच गोंधळ उडाला की हे धूर आहे की धुके? या कोड्यात टाकून गेला. धुके इतके दाट होते की रस्त्यावर वरून समोरून येणारी वाहने रस्त्यावर दिसत नव्हती. दिसत नसल्यामुळे वाहन धारक आपल्या गाडीचे दिवे लावून येत असल्यामुळे त्यासुंदर दृष्याकडे पाहून निर्सगाच्या सौंदर्याची अनुभूती आणखीच सुखी करत होती.

# 'ममता बॅनर्जींकडे इंडिया आघाडीचं नेतृत्व करण्याची क्षमता' ; शरद पवारांचं मोठं विधान

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र आणि हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत इंडिया आघाडीला पराभवाचा धक्का बसला. त्यामुळे इंडिया आघाडीतील काही पक्ष काँग्रेस नेतृत्वावर नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या पार्श्र्वभूमीवर पश्र्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीबाबत चिंता व्यक्त केली. तसेच इंडिया आघाडीच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत ममता बॅनर्जी यांना थेट इंडिया आघाडीचं नेतृत्व करण्याचा दावा केला आहे.

ममता बॅनर्जी यांच्या इंडिया आघाडीच्या नेतृत्व करण्याच्या विधानानंतर राजकीय नेत्यांच्या प्रतिक्रिया येत आहेत. आता यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी देखील प्रतिक्रिया देत मोठं विधान केलं आहे. ममता बॅनर्जींमध्ये इंडिया आघाडीचं नेतृत्व करण्याची क्षमता असल्याचं शरद पवारांनी कोल्हापूरमधील पत्रकार परिषदेत बोलताना म्हटलं आहे. शरद पवारांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.






ममता बॅनर्जी यांनी असं म्हटलं आहे की इंडिया आघाडीचं नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. यावर तुमचं मत काय? असा प्रश्न शरद पवारांना विचारला असता ते म्हणाले की, आहेच. असं आहे की, ममता बॅनर्जी या देशाच्या एक प्रभावी नेत्या आहेत. त्यांच्याकडे ती (इंडिया आघाडीचं नेतृत्व करण्याची) क्षमता आहे. आज देशाच्या संसदेत त्यांनी जे लोक निवडून पाठवलेत ते अतिशय कर्तबगार, कष्टाळू आणि जागरूक आहेत. त्यामुळे त्यांना (ममता बॅनर्जी) तसं म्हणण्याचा अधिकार आहे, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

पश्र्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीबाबत चिंता व्यक्त केली. इंडिया आघाडीच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करताना ममता बॅनर्जी यांनी म्हटलं की, मला संधी दिल्यास मी इंडिया आघाडीचं नेतृत्व करण्यास तयार आहे. मी सक्षमपणे आघाडीचं नेतृत्व करेन. मी इंडिया आघाडी बनवली होती. जे लोक या आघाडीचं नेतृत्व करत आहेत त्यांनी ही आघाडी सांभाळली पाहिजे, अधिक सक्षम केली पाहिजे. परंतु, त्यांना ती आघाडी सांभाळता येत नसेल तर त्यात मी काय करू शकते. मी फक्त एवढंच सांगेन की सर्वांनी एकत्र राहिलं पाहिजे, सर्वांनी एकजुटीने पुढे जायला हवं, असं ममता बॅनर्जी यांनी न्यूज १८ बांगला या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं होतं.

# अंबाजोगाईतील शासकीय स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा; चौघांवर गुन्हा दाखल



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या अंबाजोगाई येथील शासकीय स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात बनावट औषधांचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सुरत आणि ठाणे या ठिकाणच्या चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाचा रुग्णांना मोठा आधार आहे.

मात्र याच रुग्णालयात हा धक्कादायक प्रकार समोर आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधांचा पुरवठा केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले आहे.

याप्रकरणी औषधी निरीक्षक मनोज पैठणे यांच्या फिर्यादीवरून सुरेश पाटील, मिहीर त्रिवेदी, द्रिती त्रिवेरी आणि विजय चौधरी या चौघांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर बनावट औषध निर्मिती आणि विक्री प्रकरणात आंतरराज्य टोळी असल्याची शक्यता वर्तवली जात असून राज्यात त्यांचे जाळे पसरले असण्याची शक्यता फिर्यादीने व्यक्त केली आहे.

# एशियन पेंटच्या नावाखाली मद्य तस्करी; कंटेनरसह ५५ लाखांचा मद्यसाठा उत्पादन शुल्क विभागाने केला जप्त





दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** एशियन पेंटची वाहतूक करण्याच्या नावाखाली मद्याची तस्करी करणाऱ्या कंटेनरवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली आहे. या कंटेनर मधील मद्याचा साठा ठाणे भरारी पथकाने शिळफाटा येथे जप्त केला आहे. तसेच या प्रकरणी कंटेनर चालकाला अटक केली आहे. कर्नाटक राज्यातील हुबळी ते भिवंडीकडे जाणाऱ्या या कंटेनरमध्ये गोवा आणि हिमाचल प्रदेश निर्मित ६०० बॉक्स विदेशी व्हिस्की व रम आणि बिअरचे ११० बॉक्स असा सुमारे ५५ लाख ७९ हजारांचा मद्यसाठा हस्तगत करण्यात आल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाचे ठाणे उपअधीक्षक वैभव वैद्य यांनी दिली. मद्याने भरलेल्या या कंटेनर मध्ये एशियन पेंटची वाहतूक होत असल्याची कागदपत्रे होती ती देखील जप्त करण्यात आली आहेत. दरम्यान, थर्टी फर्स्टच्या पार्श्र्वभूमीवर अनधिकृतरित्या मद्य विक्री करणाऱ्या ठाण्यातील धाबे आणि मद्य विक्रेत्यांवर उत्पादन शुल्क विभागाची करडी नजर असून अवैध मद्यसाठा आढळल्यास कारवाई करणार असल्याचेराज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपअधीक्षक वैभव वैद्य यांनी सांगितले आहे.

# राज्यात बनावट औषध पुरवठ्याचा सुळसुळाट

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर, वर्धा, भिवंडी आणि आता अंबाजोगाईसह राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये बनावट औषध पुरवठ्याच्या घटना उघडकीस येत असून औषध पुरवठ्यात होणाऱ्या बोगसगिरीची भांडाफोड झाली आहे. या प्रकरणात मोठे आंतरराज्यीय रॅकेट असण्याची शक्यता असून शासकीय रुग्णालयांमध्येच बोगस औषधांचा साठा सापडल्यानं खळबळ उडाली आहे. मागच्या पंधरा महिन्यापासून या प्रकरणाचा तपास सुरू आहे, मात्र अद्याप प्रशासनाच्या हाती काहीच कसे लागले नाही असा प्रश्न उपस्थित केला जातोय?

अंबाजोगाई प्रमाणेच नागपूर येथील शासकीय रुग्णालयास पुरवलेल्या औषधांचा साठा बनावट असल्याचे स्पष्ट होताच कोल्हापूर मधल्या विशाल एंटरप्राइजेस कंपनीसह सुरत ठाणे आणि भिवंडी येथील औषध पुरवठादार आणि वितराकावर नागपूरच्या अजनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विशेष म्हणजे यामध्ये प्रमुख आरोपी असलेल्या विशाल एंटरप्राइजेस ने मात्र गोळ्याच्या उत्पादन करणाऱ्या कंपनीनीच दोषी असल्याचे तपासात म्हटले आहे.

CMYK

## एहसान फरामोश बांगलादेशला त्याची जागा दाखवून द्या

१९७१ पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेंव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हंटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलुम करत होता. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशचे तात्कालिन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकार विरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले मात्र पाकिस्तानने दडपशाही मार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला तेंव्हा शेख मुजीबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली. इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांगलादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे नव्हे भारतामुळेच बांगलादेशची निर्मिती झाली. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्या पासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचे च राहिले आहेत. मोठ्या भावाच्या रुपात भारताने बांगलादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बांगलादेश मधील सध्याचे सरकार आणि बांगलादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांगलादेशात सध्या भारता विरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे म्हणूनच त्यांनी बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले. गेल्या काही महिन्यात बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यात बांगलादेशात हिंदूवरील हल्ल्याच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव देखील गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारत विरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ मोहंमद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांगलादेशचा हंगामी पंतप्रधानपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे. बांगलादेश नॅशनलिस्ट पक्षाचे नेते रहुल कबीर रिझवी यांनी आपल्या बायकोची साडी जाळून भारतीय मालावर बहिष्कार घालण्याचे आव्हान केले इतकेच नाही तर भारतीय प्रसार माध्यमांवर देखील बंदी घालण्याचे आव्हान केले. इतके सगळे होत असताना डॉ मोहंमद युनूस या कट्टरपंथीयांवर कोणतीही कारवाई करत नाहीत उलट त्यांची बाजू घेऊन भारतवरच आरोप करीत आहेत म्हणूनच आता बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी आणि बांग्लादेशात भारता विरुद्ध वाढणारा जनक्षोभ कमी करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने हस्तक्षेप करावा आणि तिथे शांती सेना तैनात करावी. भारताने देखील या प्रकरणात बघ्याची भूमिका सोडून अहेसान फरामोश बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यावी.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सॉफ्ट स्किल खूप महत्त्वाची वाटते

## प्रोफेसर डॉक्टर महिंद्र ढोरे, प्र कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** आज दिनांक ०७ डिसेंबर २०२४ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या माध्यमातून नारायणराव नागरे महाविद्यालय दुसरबीड येथे सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट या विषयावर चार दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आले . या कार्यक्रमासाठी उद्घाटक प्रोफेसर डॉ . महेंद्र ढोरे ( प्र.कुलगुरू संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती) हे होते या कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे म्हणून ) , भगवान बाबा शिक्षण प्रसारक मंडळ रूमना चे सचिव तथा प्राचार्य श्री शिवराज भाऊ कायंदे , प्राचार्य डॉ . निलेश गावंडे (भास्करराव शिंगणे महाविद्यालय साखरखेर्डा तथा अधिसभा सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती)प्राचार्य डॉ . राजेंद्र बोरसे (भगवान बाबा महाविद्यालय लोणार महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक नायकवाड कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय नागरे (अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती) हे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

या प्रास्ताविक प्रा . दिलीप नायकवाड सर यांनी कार्यशाळेची रूपरेषा सांगितली व सर्व पाहुण्यांचा परिचय करून दिला . प्रमुख पाहुणे




प्रा. डॉ. राजेंद्र बोरसे सर यांनी उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी वेळ व्यवस्थापन , संवाद कौशल्य सुधारणे याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्किल डेव्हलपमेंट करून उत्तुंग भरली घ्यावी अशी इच्छा व्यक्त केली .यानंतर संस्थेचे सचिव श्री शिवराज भाऊ कायंदे यांनी उद्घाटन पर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले विद्यार्थ्यांनी समाज सुधारकांचे विचार अंगीकृत करावे. विद्यार्थ्यांनी वेगवेगळी स्किल विकसित करावे सॉफ्ट स्कील तुम्हाला इतर क्षेत्रात प्रभावीपणे संवाद साधण्यास सक्षम करतात. कौशल्य निर्माण करणे आजच्या जगात महत्त्वाचे आणि गरजेचे होत चालले आहे असे त्यांनी सांगितल.

यानंतर प्राचार्य डॉ. निलेश गावंडे सर विद्यापीठाच्या शेवटच्या टोकाला असलेले ग्रामीण महाविद्यालय नारायणराव नागरे महाविद्यालय येथे कार्यशाळेसाठी आयोजन केले याचा आनंद होतो असे सांगितले. या संस्थेने विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले आहे. विद्यार्थी ग्रामीण भागातून येऊन आज शिक्षण घेत आहेत व आपले करिअर घडवत आहे सॉफ्ट स्किल आज विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेच पाहिजे असे मार्गदर्शन त्यांनी केले.

यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक प्रोफेसर डॉ. महेंद्र ढोरे (प्र. कुलगुरू ) यांनी आपल्या भाषणात सांगितले दुसरबीड सारख्या महाविद्यालयात सर्व विद्यार्थी युनिफॉर्म मध्ये व शिस्तीमध्ये बसलेले आहे ,याचे मला कौतुक वाटत आहे. आज विद्यार्थी विकास कौशल्याचे धडे घेत आहेत याचाही आनंद वाटला. हिरवगार असलेल्या वातावरणात सर्व विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, निसर्गरम्य अशा वातावरणात विद्यार्थी या कार्यशाळेचे धडे घेत आहेत .विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. तोतारामजी कायंदे साहेबांनी संधी उपलब्ध करून दिल्या तसेच प्राचार्य डॉ. विजय नागरे सर यांच्या परिश्रमातून विद्यार्थ्यांच्या हिताचे कार्यक्रम उपलब्ध करून दिले आहेत.

तांत्रिक कौशल्य आत्मसात करून दुसरबीड चे विद्यार्थी आपल्या उच्च पदापर्यंत जाऊन पोहोचतील सोशल मीडियाचा वापर कसा करता यावर तुमचे भविष्य आहे. गोल सेटिंग, इंटरव्यू स्किल, कम्युनिकेशन स्किल्स सोशल मीडियाचा विद्यार्थ्यांनी चांगला वापर करावा तुमच्या या पोस्टवरून तुमचे समाज मूल्यांकन करतात विद्यार्थ्यांच्या विकासासाठी करिअर कट्ट्यातून विविध उपक्रम राबवले जातात विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा व विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तिमत्व घडवावे असे प्र.कुलगुरु म्हणाले. विद्यार्थ्यांनी विविध स्किल घेऊन आपल्या पायावर उभे राहावे या स्किलचा उपयोग घेऊन उद्योग व्यवसायाकडे वळावे असे त्यांनी सांगितले.

विविध फॅसिलिटी तुमचे प्राचार्य डॉ. विजय नागरे सर उपलब्ध करून देतात याचा आनंद वाटला नागरे महाविद्यालयातील छड्ड युनिट सुद्धा उत्तम काम करत आहे असे ते म्हणाले. सॉफ्ट स्किल हे हार्डवर्क म्हणून शिकून घ्यावे असे त्यांनी त्यांच्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय नागरे सर यांनी सांगितले या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांनी आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी याचा फायदा करून घ्यावा.

विद्यार्थ्यांनी शिस्तीचे धडे घेऊन ही सॉफ्ट स्किल शिकून घ्यावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण कलागुणांचाविकास व्हावा यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले आहे सॉफ्ट स्किल म्हणजे आपल्या व्यक्तिमत्त्वातील दडलेली विशेषता तसेच इतर गुणवैशिष्ट्ये जी आपल्याला दैनंदिन जीवनात इतरांशी संवाद साधताना तसेच आपल्या निवडलेल्या क्षेत्रात यशस्वी होण्यास आपणास मदत करत असतात.

या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्याचा उपयोग होईल .असे मार्गदर्शन त्यांनी केले .या कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गणेश घुगे यांनी केले .आभार प्रदर्शन प्राध्यापक वाघ यांनी केले . शिक्षक व शिक्षकेतर आणि विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पुणे-मुंबई द्रुतगतीवरील अपघातात ते सहा सेकंद महत्वाचे ठरले! सहा जण थोडक्यात बचावले

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे– मुंबई द्रुतगती मार्गावर भरधाव ट्रेलर वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने फूड कोर्ट ला भीषण धडक दिली. घटनेत एकाचा ट्रेलर खाली सापडून मृत्यू झाला आहे. सुदैवाने मोठी जीवितहानी झाली नाही. काही सेकंद अगोदर ज्या ठिकाणी अपघात झाला तिथे सहा व्यक्ती सीसीटीव्हीमध्ये पहायला मिळतात. बाजूला जाताच भरधाव ट्रेलरने फूड कोर्ट ला भीषण धडक दिली. इंद्रदेव पासवान या हॉटेल कामगाराचा मृत्यू झाला आहे. बिपीन यादव अस ट्रेलर चालकाचे नाव आहे. पोलिसांनी यादव ला ताब्यात घेतलं आहे. तो पुण्याहून मुंबई च्या दिशेने जात होता.



सायंकाळी पाच वाजता भरधाव ट्रेलर ने थेट फूड कोर्ट ला भीषण धडक दिली. घटनेत हॉटेल कामगाराचा मृत्यू झाला आहे. घटनेचा सीसीटीव्ही सध्या सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरत आहे. घटनेच्या आधी अपघातस्थळी सहा व्यक्ती तिथे दिसतात. तिथून बाजूला होताच अगदी ५ ते ६ सेकंदातच नियंत्रण सुटलेला भरधाव ट्रेलर आला आणि एकाला चिरडत फूड कोर्ट ला भीषण धडक दिली. सीसीटीव्ही फुटेज विचलित करणारे आहे. सुदैवाने मोठी जीविहितहानी टळली. ट्रेलर ने काही वाहनांना धडक देखील दिली आहे. घटनेनंतर अनेक जण फूड कोर्ट मधून सैरावैरा धावत बाहेर पडले. अनेकांनी आपली वाहन आणि वाहनातील नागरिक सुखरूप आहेत का? ते पाहिले.

## शूटिंग सुरु अन् अभिनेत्याने स्मिता पाटीलच्या थोबाडीत दिली, सेटवर ढसाढसा रडली अभिनेत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** अमोल पालेकर एक प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता आहे. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक संस्मरणीय चित्रपट दिले आहेत. नुकताच अमोल पालेकर यांनी 'भूमिका' चित्रपटाबाबत धक्कादायक खुलासा केला. त्यांनी सांगितलं की, चित्रपटातील एका दृश्यासाठी दिग्दर्शक श्याम बेनेगल यांनी अभिनेत्रीला न सांगता थप्पड मारण्यास सांगितलं होतं. सुरुवातीला त्याने नकार दिला होता, पण नंतर त्यांनी अनिच्छेने ते केलं.

'द ललनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीदरम्यान अमोल पालेकर यांनी 'भूमिका' चित्रपटातील कानशिलात मारण्याच्या दृश्याबद्दल सांगितलं. ते म्हणाले, 'श्याम बेनेगल म्हणाले की, मी स्मिता पाटील यांना न सांगता कानशिलात मारायची. मी म्हणालो नाही, मी ते करू शकत नाही. मी रिहर्सल केली नाही, असं काहीही करण्यास नकार दिला. तुम्ही काय करत आहात हे तुमच्या सहकलाकारांना कळायला हवं. त्यांच्या नकळत काहीही करणं माझ्या मते चुकीचे आहे आणि म्हणूनच मी ते करत नाही.

अमोल पालेकर पुढे म्हणाले, 'मी एका महिलेवर हात कसा उचलू शकतो? मी माझ्या आयुष्यात हे कधीच केले नाही आणि कधीच करणार नाही.' मात्र त्यांनी ते केलं आणि स्मिता पाटीलला थोबाडित मारताच सेटवरील संपूर्ण वातावरण तापलं.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवजातीला दिशादर्शक ध्रुवतारा : डॉ. गोपाल बछीरे

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवजातीला दिशादर्शक ध्रुवतारा असे वक्तव्य डॉ. गोपाल बछीरे महापरिनिर्वाण दिनानिमित्त व्याख्यानात केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग च्या उपायुक्त मा. जयश्री सोनकवडे जाधव यांनी सामाजिक न्याय भवन छ. संभाजीनगर येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमात डॉ. गोपाल बछीरे प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत




होते बाबासाहेबांच्या जीवनपटावर प्रकाश टाकून ते पुढे म्हणाले बाबासाहेबांचे कार्य फक्त दलित पत दलित यांच्या उद्धारासाठी केले असे म्हणणे, म्हणजे सूर्याला लाजावण्यासारखे आहे बाबासाहेबांचे कार्य संपूर्ण मानव जातीचा उद्धार करणारे आहे, त्यामुळे ते भारताचे उद्धारक झाले आणि त्यांची बुद्धिमत्ता व कार्याचा सन्मान म्हणून आमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाने 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' हा जगातील सर्वोच्च किताब डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम जात पडताळणी समितीचे अध्यक्ष श्री हरपाळकर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व श्री कुलकर्णी साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला या कार्यक्रमास शासकीय वस्तीगृहाच्या शेकडो विद्यार्थीनी, प्रशासकीय अधिकारी, व मोठ्या संख्येने आंबेडकर प्रेमी उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# मेहकर येथील औद्योगिक क्षेत्राला आगामी काळात सोनेरी दिवस

## नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांचा विश्वास : एमआयडीसीच्या पाहणीत आढळले अतिक्रमण

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर** : मेहकर शहर हे समृद्धी महामार्गावर लगत असून शहराला ऐतिहासिक वारसाही लाभलेला आहे. मेहकर शहराला औद्योगिक दृष्ट्या सक्षम करून येणाऱ्या काळात मेहकर शहरातील औद्योगिक क्षेत्राला सोनेरी दिवस आणू, असा विश्र्वास मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी एमआयडीसी एरियाच्या पाहणी प्रसंगी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला. मेहकर शहर हे बालाजी शारंगधर बालाजी यांचे शहर आहे. मेहकर शहराला ऐतिहासिक वारसाही मोठ्या प्रमाणात लाभलेला आहे. त्याचबरोबर औद्योगिक क्षेत्रातही मेहकर शहराला प्रचंड संधी असताना येथील राजकीय उदासीनता, प्रशासकीय निष्काळजीपणा या कारणाने मेहकर शहरातील एमआयडीसीला शाप लागलेला आहे. सन १९८९ मध्ये ५२ एकरावर एमआयडीसी एरिया विस्तारित करण्यात आला होता. मात्र, येथील राजकीय उदासीनता, प्रशासकीय निष्काळजीपणामुळे मेहकर शहरातील औद्योगिक क्षेत्रात एक मरगळ आली आहे. मेहकर येथील एमआयडीसी कागदावरच राहिली असून एमआयडीसी एरियाचा पुरता बट्ट्याबोळ झाला आहे. एमआयडीसी एरिया विकसित करण्यासाठी येथील लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेणे अपेक्षित होते. मात्र तसेच झाले नाही, परिणामी मेहकर शहर हे तब्बल पंधरा वर्षे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने मागे गेले आहे. मेहकर एमआयडीसीमध्ये ५२ एकर जमिनीचे क्षेत्र असताना या ठिकाणी एकही नवीन उद्योग सुरू करण्यास लोकप्रतिनिधींन पुढाकार घेतला नाही, परिणामी एमआयडीसी एरियातील सर्व जमिनीवर अतिक्रमण झाले असल्याचे दिसून येत आहे. केवळ चार-पाच एकरचा एरिया सोडला तर उर्वरित सर्व जमीन अतिक्रमणग्रस्त झाली आहे. त्या ठिकाणी कोणत्याही सुविधा नाहीत, रस्ते नाहीत, वीज नाही, पाणी नाही, एकही उद्योग त्या ठिकाणी उभा झाला नाही. दळणवळणाच्या सुविधा नसल्यामुळे या ठिकाणी उद्योग उभे राहू शकले नाहीत. या औद्योगिम क्षेत्रात सुविधा उपलब्ध करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेतला नसला तरी आता मात्र येथील एमआयडीसीचा एरिया विकसित करून या ठिकाणी नवउद्योजक आणण्यासाठी प्रयत्न राहणार आहे. त्याचबरोबर एमआयडीसीच्या एरियावर झालेले अतिक्रमण काढण्यासाठी एसडीओ यांची शिवसैनिकांनी भेट घेतली असून त्या संदर्भात माहिती एसडीओंना दिली आहे. यावर एसडीओ योग्य निर्णय घेतील, त्याचबरोबर एमआयडीसी एरियामध्ये विदर्भाला मिळणाऱ्या डी प्लसच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुद्धा प्रयत्न केले जाणार आहे. या ठिकाणी नवउद्योजक येण्यासाठी त्यांना दळणवळणाच्या व अद्यावत सर्व सुविधा उपलब्ध करून देऊन नवउद्योजकांना या ठिकाणी उद्योग सुरू करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. आतापर्यंत येथील झाला नसला तरी येणाऱ्या काळात येथील एमआयडीसी हे मात्र विकसित केली जाणार आहे. त्यासाठी सर्व सोयी सुविधा विदर्भाच्या डी प्लस प्रमाणे उपलब्ध करून देण्यासाठी आमचे बोलल्या प्रमाणे सहकार्य राहणार आहे. येथील एमआयडीसी विकास विकसित करण्यासाठी पुरेपूर सहकार्य केले जाईल,नवउद्योजकांना या ठिकाणी उद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहीत केले जाईल,मेहकर शहरातील एमआयडीसी सुरू करून मेहकर शहराला औद्योगिक धंद्यासह नावारूपाला आणून येथील बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, यासह इतर प्रश्र्नही तात्काळ मार्गी लावण्यासाठी सतत पाठपुरावा करू आणि मेहकर शहर हे एका नव्या रूपाने विकसित करू असा विश्र्वास आमदार सिद्धार्थ खरात यांनी यावेळी व्यक्त केला.





### राजकीय उदासीनतेने लावली एमआयडीसीची वाट

मेहकर येथील औद्योगिक वसाहत केवळ राजकीय इच्छाशक्तीअभवी विकसीत झाली नाही, विकासाचे स्वप्न दाखवून कोट्यवधी रुपयांचे विकासकामे करण्याचे भासवून मतदारांची दिशाभूल करण्यात आली.एमआयडीसीची अक्षरश: वाट लागली. एमआयडीचीच्या एरीया अतिक्रमणाने बटबटून गेला.सुविधांअभावी एमआयडीचा बट्ट्याबोळ झाला असताना एमआयडीचे अस्तित्व केवळ कागदावरच उरले होते. मात्र नवनिर्वाचित आ. सिद्धार्थ खरात यांनी एमआयडीची पाहणी केली असता गेल्या पंधरा वर्षाच्या आश्र्वासनाची पोलखोल झाली.



देविदास खनपटे
मुख्य संपादक


---

## ऊसाला पहिली उचल ३७०० रुपये मिळावी

### स्वाभिमानी शेतकरी संघटनेची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी** : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जयसिंगपूर येथे घेण्यात आलेल्या ऊस परिषदेत पहिली उचल ३७०० रुपयेची मागणी केली आहे. राजारामबापू कारखान्याने ३२०० रुपये जाहीर करून कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला आहे. तीही अपुरी असून राजारामबापू सह सर्वच कारखान्यानी मागणीनुसार पहिली उचल जाहीर करावी अन्यथा रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी दिला आहे.



खराडे म्हणाले सोलापूर जिल्ह्यातील विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा साखर उतारा १०.५० आहे तरीही त्यांनी पहिली उचल ३५०० रुपये जाहीर केली आहे सांगली जिल्ह्यातील सर्वच साखर कारखान्याचा साखर उतारा बाराच्या पुढे आहे त्यामुळे ३७०० रुपये जाहीर करायला काहीच हरकत नाही मात्र ती भूमिका घ्यायला जिल्ह्यातील साखर कारखानदार तयार नाहीत गेल्या वर्षीही जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी योग्य दर दिला नाही गेली वर्षभर साखरेचा दर ही चांगला राहिला मात्र अनेक कारखान्यानी पहिल्या उचलीनंतर शेवटचा हप्ता दिलेला नाही. साखरेची आधारभूत किंमत सद्या ३१ रुपये आहे ती वाढविण्यासाठी साखर कारखानदारांनी लढण्याची भूमिका घ्यावी, त्या लढाईत आम्ही ही खांद्याला खांदा लावून लढायला आम्हीही तयार आहोत. साखरेची आधारभूत किंमत ३१ रुपये वरून ३५ रुपये झाल्यास शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. मात्र साखर कारखानदार या प्रश्र्नावर संघर्ष करायला तयार नाहीत हे वास्तव आहे जिल्ह्यातील ऊस दराचा तोडगा काढण्यासाठी जिल्हा अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा त्यांनी प्रयत्न करून या प्रशनी साखर कारखानदार, शेतकरी संघटना याची संयुक्त बैठक घ्यावी आणि तोडगा काढावा किंवा कारखानदारांनी आपापली पहिली उचल जाहीर करून कोंडी फोडावी असे आवाहन जिल्ह्यातील कारखानदारांना करत आहोत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही आमचे आवाहन आहे घरात बसून दराची कोंडी फुटणार नाही त्यासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी ठेवावी लागेल संघटनेवर जबाबदारी ढकलून चालणार नाही तर तुमच्या ही सक्रिय सहभागाची गरज आहे त्यासाठी राजकीय अभिनिवेश बाजूला ठेवून शेतकरी म्हणून लढण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन त्यांनी केले.

## ठाण्यातील खंडोबा मंदिरामध्ये चंपाषष्ठी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : ठाण्यातील भक्तांमध्ये चंपाशष्ठीच्या उत्सवाची मोठी उत्सुकता आणि भक्तिभाव दिसून येत आहे. ६ दिवस चालणाऱ्या या उत्सवाचा मुख्य दिवस चंपाशष्ठी उत्सव ठाण्यातील जव्हारबाग येथील श्री खंडोबा मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आज या मंदिरात श्री खंडोबाची पूजा, अभिषेक, महाआरती आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जव्हारबाग येथील श्री. खंडोबा मंदिरांमध्ये भक्तांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली. भक्तांमध्ये जल्लोष आणि उत्साह दिसून आला. सायंकाळी याठिकाणी महाप्रसाद भंडारा देखील आयोजित करण्यात आला आहे. चंपाशष्ठीच्या निमित्ताने भजन आणि कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. यंदा उत्सवासाठी पर्यावरणपूरक सजावट आणि प्लास्टिकमुक्त उपक्रम राबवण्यात आले. शहरातील सामाजिक संस्थांनी या निमित्त रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य तपासणी शिबिर तसेच अन्नदानाचे आयोजन केले. ठाणे महापालिका आणि पोलीस विभागाने वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षेची विशेष काळजी घेतली. चंपाशष्ठी हा खंडोबा भक्तांसाठी महत्त्वाचा सण असून, ठाण्यातील या उत्सवाने धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा प्रयत्न केला जातो.

## जनतेने शुद्धीवर यायला हवं : अंजली दमानिया

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : या महाराष्ट्रात शाळा नाही कॉलेज नाही हॉस्पिटल नाही रुग्णांना न्यायला ॲम्बुलन्स नाहीये मुलांना शाळेत जायला रस्ते देखील धड नाहीये काही मुलं पोहोच जातात काहींना तिकडे जायला ब्रिज देखील नाहीये आणि अशा परिस्थितीत ज्या महाराष्ट्रावर इतकं अफाट कर्ज झालंय त्या महाराष्ट्रातले सगळे नेते अक्षरशः मजा करतात कुठेतरी हे सगळं थांबायला हवं कालच भालचंद्र नेमाडेपण म्हणाले की हा जो अफाट उधळपट्टीची चालली आहे ती कुठेतरी थांबायला हवे आणि या सगळ्या राजकीय पक्षांना आता शुद्धीवर आणायला हवं

जाती जाती धर्माधर्मात जे युद्ध लावून निधन दिला जातो आणि लोकांना बेवकूफ बनवण्याचं काम सगळे पक्ष एकत्र मिळवून करतात तर ते बटेंगे तो कटेंगे नाहीये सब साथ साथ लुटेंगे हा आहे त्यांचा खरा नारा.

आज मी तुमच्या पुढे आली आहे अजित पवार यांना एक हजार कोटीची त्यांची मालमत्ता परत देण्यात आली आहे अशी जी बातमी आज माध्यमांपुढे आली खरच सांगते तळपायाच्या मस्तकाला गेली हे चाललय का तुम्ही आधी त्यांच्या मागे ये डब्ल्यू लावणार त्यांच्या मागे सगळ्या यंत्राला लावणार इन्कम टॅक्सच्या रेट्स करणार २०२१ मध्ये जन्मेश्र्वर वर साखर कारखान्यावर रेड झाली होती आणि त्याच्यात फायर पॉवर नावाच्या कंपनीस जेवढ्या आहेत ज्या सगळ्यांना माहिती आहेत कंपनीस या सुनेत्रा पवार अजित पवार यांनी सुरू केलेल्या कंपनीज आहेत त्यातनं सुरेंद्र पवार आणि अजित पवार बाहेर पडले पण आज तगायत हे त्यांच्या जवळचे नातेवेग जे आहेत तेच त्या कंपन्या चालवतात.

या सगळ्या प्रॉपर्टीजच्या अटॅच केले होत्या त्या स्पशा सुटल्या आणि कशा सोडवल्या गेल्या हे तुमच्या पुढे आज आणायचं आहे आणि हे अतिशय महत्त्वाचा आहे समजून घ्या एक साखर कारखाना जनमदेश्र्वर एस एस के नावाचा साखर कारखाना जो होता तो १९९९ २००० साली सुरू होतो २०१० साली त्याचा एम पी ए म्हणजे तो होतो त्यांचा दोन प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढतं म्हणून महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक हे त्यांचा ऑप्शन करतात ऑप्शन



मध्ये हायस्पीडर कोण होतं तर गुरु कमोडिटी नावाचे कंपनी होती दहा वर्ष बंद असलेली कंपनी ज्याचे फक्त ऑथराईज आहे ते पेड अक्षर कॅपिटल साडेसहा लाखाच्या आसपास होतं ही गुरु कंपनीमध्ये सगळ्या कंपन्यांकडून पैसे येतात आणि हे पैसे आल्यानंतर आणि त्याच्यापैकी एक कंपनीची शेवटची त्या ऑर्डरमध्ये आणि आज मी हे जे बोलतेय ते फक्त आणि फक्त या इन्कम टॅक्स अजून बोलते.

जलंदेश्वर शुगर मिल्स नावाचे एका कंपनीत आधी ट्रान्सफर केले तर पहिले ओमकार शिवालिक अशा अनेक कंपन्या आहेत शुभम इन्वेस्टमेंट हे शुभम आणि चिनार या शल कंपनीज आहेत कंपनीज आहेत प्रीमियम देऊन त्यांनी शहर कोणी गोळा केला आणि ते पैसे त्यांनी गुरु कमोडिटी मध्ये टाकले आणि सगळ्यात महत्त्वाचं नाव पॉईंट नंबर सहा जनदेश वर शुगर मिल प्रायव्हेट लिमिटेड ते ही चरण देशभर शुगर मिल प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी काय आहे हे आपण समजून घेऊया याच्यात जो पैसा आला तर कोणी ट्रान्सफर केला आता यांनी सगळ्या या पाच सहा कंपन्यांनी पैसे गुरुमध्ये टाकले आणि गुरुंदी बिल्डिंग करून जन्मेश्र्वर साखर कारखाना मिळवला ज्या दिवशी तो साखर कारखाना मिळवला त्याच्या त्या दिवशी लीज वर ही सहाव्या नंबरची जी कंपनी आहे त्या कंपनीला तो साखर कारखाना लिस्ट वर देण्यात आला एवढंच नाही तर लिस्ट बरोबर त्यांनी एक पावर नी केलं आणि जनमदेश्र्वर शुगर मिल्स प्रायव्हेट लिमिटेड ज्याच्या ज्यांनी खरं वीस कोटी गुरूला दिले होते त्या कंपनीला तो साखर कारखाना देण्यात आला

अजित पवार त्यांना परत मिळालं उपमुख्यमंत्री पद जेथे सहा वेळा भूषवतात सो कॉल हे त्यांना पद दिलं गेलं १००० कोटीची मालमत्ता परत दिली तर अजित पवार इतर कुठेही जातीलच कशाला आणि हात जो सगळा फेर चाललाय ना की यंत्रणांचा वापर करायचा केसेस टाकायच्या त्यांना आपल्या पक्षात घ्यायचं आणि मग केसेस परत घ्यायच्या हे चित्र जोपर्यंत बदलत नाही आणि एकाचच नाहीये सगळे पक्ष तेच आहेत सगळ्यांच्या फायली यांच्याकडे आहेत आणि हेच दाखवून ब्लॅकमेल करून हे जे आपल्या पक्षात घेतलं जातंय त्याचा धडधडीत उदाहरण ही ऑर्डर आहे तर मला असं खूप वाटतंय की आता जनतेने शुद्धीवर यायला हवं बटेंगे तो कटेंगे नाही हम साथ साथ लुटेंगे हात जोडा परत परत आपण बघतोय हेच यंत्र तंत्र वापरला जात आहे आणि हे कुठेतरी आता थांबायला हवं

---

## महत्त्वाचे...

### निकाल पाहिजे तसा लागला नाही : आमदार ज्योती गायकवाड



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : निकाल पाहिजे तसा लागला नाही. मतदानाच्या टक्केवारीत तफावत असल्याने आम्ही त्याचा निषेध केलेला आहे.अशी माहिती आ.ज्योती गायकवाड यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी त्या पुढे म्हणाल्या की, आज शपथविधी सोहळा पार पडला असला तरी, आम्ही शपथ घेतलेली नाही, पण कामकाज काय चालू आहे हे पाहिलेले आहे. लोकांनी भरभरुन प्रेम दिले याचा आनंद आहे, आशीर्वाद दिलेला आहे मी त्यांचे आभार मानतो. जो निकाल लागलायला पाहिजे होता तसा लागलेला नाहीये, मतदानाची अचानक टक्केवारी वाढलेली आहे. ही तफावत कशामुळे झालेली आहे. याचा तपासणी झाली पाहिजे त्यामुळे त्याचा आम्ही निषेध केलेला आहे. अशी माहिती धारावीच्या आमदार ज्योती गायकवाड यांनी दिली.

### कोल्हापुरात ५४ वे पुष्प प्रदर्शनाचे आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** :कोल्हापुरात गार्डन क्लब आणि कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने ५४ व्या पुष्प प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हरित समृद्धी वाढावी, यासाठी हे पुष्प प्रदर्शन भरवले जाते. १९७३ सालापासून ते आत्तापर्यंत अविरतपणे हे प्रदर्शन दरवर्षी आयोजित करण्यात येतंय. कोल्हापूर शहरातील महावीर उद्यान या ठिकाणी दिनांक ६ आणि ८ डिसेंबर असे ३ दिवसीय हे प्रदर्शन आहे. यामध्ये गुलाब, विविध प्रकारची फुले, पुष्परचना, कुंडीतील रोपे, फुले, पाने व पाकळ्यांची रांगोळी, बुके, सॅलड डेकोरेशन, बोन्साय, मुक्त रचना, लँडस्केपिंग अशा स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती गार्डन्स क्लबच्या अध्यक्षा पल्लवी कुलकर्णी यांनी दिली आहे.

### एपीएमसी मार्केटमध्ये मनुक्याचे दर स्थिर




दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी** :एपीएमसी मार्केटमध्ये सध्या मनुका आणि खडा मसाल्याचे दर काही महिन्यापासून स्थिर आहेत. मनुक्याचे दर २८० ते ४८० रुपये प्रतिकिलो दरम्यान आहेत. ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे, मात्र नवीन वर्षात हे दर वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे. मनुक्याची गुणवत्ता चांगली असल्यामुळे ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत. सध्याच्या बाजारात चांगल्या दर्जाच्या मनुक्यांना अधिक मागणी आहे. उत्पादन घटल्यामुळे किंमती सध्या स्थिर आहेत असे व्यापाऱ्याने सांगितले आहे. बाजारातील परिस्थिती पाहता आगामी काही दिवसांत दर आणखी वाढण्याची शक्यता वर्तवलीजातआहे. खडा मसाल्यामध्ये प्रत्येक घटकाची किंमत वेगवेगळी आहे अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.

### मुख्यमंत्र्यांनी घेतले मधुकर पिचड यांचे अंतिम दर्शन



दैनिक आपला विदर्भ



**अहिल्यानगर/प्रतिनिधी** :भाजपचे नेते मधुकर पिचड यांच्या अंतिम दर्शनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पोहचले आहे. त्याच्यासोबत दिलीप वळसे पाटील हे यांनी देखील पिचड यांना श्रध्दांजली अर्पण केलीये.अकोले तालुक्यातील राजुर येथे त्यांच्या पार्थीवाचे दर्शन घेत त्यांनी मधुकर पिचड यांना श्रध्दांजली अर्पण केली आहे. यावेळी राजुर गावात मोठा पोलिस फौजफाटा लावण्यात आला होता.

# सत्ताधाऱ्यांना वठणीवर आणण्याचे काम न्यायव्यवस्थाच करू शकते

## आ.सिद्धार्थ खरात यांचे प्रतिपादन

## वकिल संघाच्यावतीने भव्यदिव्य सत्कार

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** : राजकीय सत्तेवर बसलेल्यांच्या हाती देश मजबूत आहे.असे समजू नका, कारण देश भयंकर अडचणीत आहे. लोकशाही व्यवस्था लोकशाही संस्था ठिसूळ होत आहे. त्यांना कमकुवत करण्याचे पाप या देशात सुरू आहे. परंतु,तुम्ही जरी सत्तेत नसले तरी तुम्ही सत्तेपेक्षा कमी नाही, असे माझे मत आहे, म्हणून लोकशाही व्यवस्था लोकशाही संस्था मजबूत करण्यासाठी आपण एकसंघ प्रयत्न करू,न्यायव्यवस्थाच राजसत्तेला वढणीवर आणू शकते,तुमच्यामुळेच देश एकसंघ व मजबूत राहू शकतो,असे ठाम मत नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले. ते मेहकर बार असोसिएशनच्या वतीने सत्कार कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाप्रारंभी मेहकर वकिल संघाच्या वतीने आ. सिद्धार्थ खरात यांचा सत्कार करण्यात आला. या भव्य दिव्य सत्कार समारंभाला वकील संघाचे अध्यक्ष ॲड. निखिल मिटकरी, उपाध्यक्ष ॲड. संदीप वाघमारे, सचिव ॲड. समाधान कटारे लक्ष्मण घुमरे, किशोर गारोळे, ॲड. अनंत वानखेडे, ॲड. आकाश घोडे, ॲड. संदीप गवई, ॲड. विजय मोरे, ॲड. नवघरे, ॲड. लांडगे व बार असोसिएशनचे सर्व सदस्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन ॲड. धोंडगे यांनी केले.

यावेळी मेहकर बार संदर्भाने असलेल्या समस्यावर ड्. मिटकरी यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच ड्.अनंत वानखेडे यांनी सुद्धा वकिलांच्या एकूण समस्या आ. सिद्धार्थ खरात यांच्यासमोर मांडल्या. कार्यक्रमांमध्ये आ. सिद्धार्थ खरात यांनी वकिल संघाच्या समस्या एकूण घेऊन त्यांनी केलेल्या मागण्या लवकरच पूर्णत्वास नेण्याची ग्वाही दिली. भव्य दिव्य इमारत व लायब्ररी निर्माण करू,असे आश्र्वासन दिले.

कार्यक्रमाचे आभार ॲड.वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमाला महिला वकील तसेच ज्युनियर व सीनियर विधीज्ञ यांच्या उपस्थितीमध्ये मेहकर बार असोसिएशनचे सर्व सदस्य यांनी आ. सिद्धार्थ खरात यांचा सत्कार केला.तर न्यायालयायातील कारकून असोसिएशनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव यांनी आ. सिद्धार्थ खरात यांना शारंगधर बालाजी यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता झाली.

# रस्ता त्वरित करा अन्यथा १२ डिसेंबरला रास्ता रोको आंदोलन

## संतप्त नागरिकांचे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदनातून इशारा

दैनिक आपला विदर्भ

■ अवधूत खडककर



**उमरखेड:** शहरातील मुख्य रस्ता छत्रपती शिवाजी महाराज चौक ते ढाणकी रोड उड्डाणपूल बायपास रस्त्याचे अर्धवट काम त्वरित करावे व धुळीपासून होणाऱ्या त्रासाला नागरिकांना दिलासा द्यावा येत्या १० डिसेंबर पासून रस्त्यावरचे अर्धवट कामाला सुरुवात करावी अन्यथा येत्या १२ डिसेंबर रोजी ढाणकी रोडवरील सर्व व्यापारी नागरिक महाविद्यालयीन व शाळेत शाळकरी विद्यार्थ्यांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून सार्वजनिक बांधकाम उपविभाग अभियंता प्रमोद दूधे यांना दिला आहे.

मागील सहा महिन्यापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गो.सी. गावंडे महाविद्यालय पर्यंत येथील रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असून ते अद्यापही पूर्णत्वास गेले नाही. सदरील काम हे आज रोजी बंद स्थितीत आहे. रस्त्यावर टाकण्यात आलेले माती व गिटीमुळे वाहतुकीसाठी प्रवाशांना तसेच त्याच रस्त्यावरील महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांना नाहक त्रास होत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या व शालेय विद्यार्थ्यांच्या रस्त्याच्या धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे रस्त्यावरील धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याचे बरे वाईट झाल्यास त्यास सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित ठेकेदार जबाबदार राहील तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दि १० डिसेंबर पूर्वी सदरील रस्त्याच्या कामाला सुरुवात करावा अन्यथा संतप्त प्रवासी व महाविद्यालयीन तसेच शालेय विद्यार्थ्यांकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल असेही निवेदनातून म्हटले आहे.

सदर प्रलंबित रस्त्याच्या कामामुळे मातीचे रूपांतर धुळीत होत असून प्रवाशांचे हाल होत आहेत व धुळींची लोट रस्त्याच्या बाजूला असलेल्या दुकानात व नागरिकांच्या घरात जात असून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे त्यामुळे धुळीचे कण नाकात, तोंडात जाऊन सर्दी, खोकला व घशांचा त्रास सुरू झाला असून आरोग्याचा प्रश्र्न निर्माण होत आहे या गांभीर्य विषयी प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी.

सदर होणारा त्रास प्रशासनाने कमी करून प्रवाशांना दिलासा द्यावा अन्यथा येत्या दि १२ रोज गुरुवारी सकाळी १०.०० वाजेपासून सर्व व्यापारी व नागरिक तसेच महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांच्या वतीने ढाणकी रोड उमरखेड येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून दिला आहे. यावेळी ढाणकी रोड वरील सर्व नागरिक व्यापारी महाविद्यालयीन व शाळकरी विद्यार्थी उपस्थित होते.

## ■ लोणार सरोवरच्या कामांची विभागीय आयुक्तांकडून पाहणी





विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी आज लोणार सरोवरावरला भेट दिली. त्यांनी लोणार सरोवर विकास आराखड्यांतर्गत सद्यस्थितीत सुरु असलेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि स्थळ पाहणी केली. यावेळी प्र.जिल्हाधिकारी सदाशीव शेलार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहो यासाठी चंद्रकांत खैरे यांनी घेतली पोलीस आयुक्तांची भेट



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांमध्ये तीन हत्येच्या घटना समोर आल्या आहेत. हर्सुल परिसरात झालेल्या हत्येमुळे शहरात एकच खळबळ उडाली होती. त्यानंतर मिसरवाडी भागात शुल्लक कारणावरून एकाची हत्या करण्यात आली होती आणि ५ डिसेंबर रोजी देखील झाल्टा फाटा येथील एका हॉटेलमध्ये एका निष्पाप अभियंत्याची हत्या झाली होता. शहरात वाढत्या गुन्हेगारीने तसेच हत्येच्या घटनेने डोके वर काढल्याचे चित्र निर्माण झाले आहे. यामुळे ठाकरेंच्या शिवसेना ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी शिष्टमंडळासह पोलीस आयुक्तांची भेट घेत या संदर्भात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच येत्या सात दिवसांमध्ये जर अशा घटनांना आवर घातला नाही तर क्रांती चौक ते पोलीस आयुक्तालयापर्यंत भव्य मशाल यात्रा काढण्यात येईल असा अशी माहिती शिवसेना ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी दिली आहे.

## ब्ल्यू बर्ड स्कूलच्या विद्यार्थ्यांचे तबला संगीत परीक्षेत यश

दैनिक आपला विदर्भ

**औसा/प्रतिनिधी** : तालुक्यातील आलमला येथील विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल मधील विध्यार्थ्यांनी भारतीय संगीत कलापीठ अंतर्गत स्वरश्री संगीत विद्यालय औसा येथे घेण्यात आलेल्या तबला संगीत विषयक परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. यामध्ये शाळेतील इ. ९ वी वर्गातील विद्यार्थी कु. प्रतिक पांडुरंग सुर्यवंशी हा ९८ टक्के मार्क घेवुन विशेष योग्यता श्रेणीमध्ये शाळेतून प्रथम आला व समर्थ सुरेश गवळी हा ९५ टक्के गुण घेवुन विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे तर शिवलिंग विलास सुर्यवंशी इ. ७ वी वर्गातील विद्यार्थी ९५ टक्के गुण घेवुन विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे. या विध्यार्थ्यांना प्राचार्या स्वाती कापसे व संगीत शिक्षक अजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

## विविध वृत्त...

## महायुतीला दिलेला कौल हा जनतेचा कौल नसून हे इव्हीएम द्वारे मिळालेले राक्षसी बहुमत आहे- अनिल गोटे



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका भाजपने इव्हीएम मध्ये छेडछाड करुन भ्रष्टाचार करुन निवडणूक आयोग, पोलीस प्रशासन, महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांना कोट्यावर्षीचा मलिदा चारून जिंकल्या आहेत. यावर आता देशाचेच एकमत झाले आहे. त्यामुळे महायुतीला मिळालेले हे बहुमत नसून हे ईव्हीएम द्वारे मिळालेले राक्षसी बहुमत असल्याचा गंभीर आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी यावेळी केला आहे.

निवडणुकांचे निकाल हाती आल्यानंतर धुळेकर नागरिक आमची भेट घेऊन आम्हाला सांगत आहे की आम्ही सर्वांनी तुम्हाला म्हणजे मशालीला मत दिले होते आमचे मत गेले कुठे असा प्रश्र्न आमच्या समोर उपस्थित करत आहे म्हणून आम्ही या प्रश्र्नाचे उत्तर शोधण्यासाठी ९ डिसेंबर रोजी सायंकाळी धुळे शहरातून विशाल असा मशाल मोर्चा काढणार असून यामध्ये ईव्हीएम मशीन ची प्रतीकत्मक अंतयात्रा देखील आम्ही यावेळी काढणार असल्याची माहिती माजी आमदार अनिल गोटे यांनी यावेळी दिली.

## आज शिवसेना महायुतीच्या वतीने मेहकर मध्ये कृतज्ञता मेळाव्याचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ



**मेहकर/प्रतिनिधी** : रविवारी ता.८ रोजी अकरा वाजता मेहकर येथील वेदिका लॉन सभागृहात शिवसेना महायुतीच्या वतीने कृतज्ञता मेळाव्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.महायुतीतील सर्व पक्षांचे आजीमाजी पदाधिकारी मेळाव्याला उपस्थिती लावणार आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर महायुतीतील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व सर्व मित्र पक्षांच्या वतीने या कृतज्ञता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. मेहकर येथील सोनाटी रोड चौफुली जवळील वेदिका लॉन सभागृहात सदर आयोजन करण्यात आले आहे. महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या आजीमाजी पदाधिकाऱ्यांनी सदर कृतज्ञता मिळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे ,असे आवाहन शिवसेना, युवासेना, महिला आघाडी व मित्र पक्षांच्या वतीने करण्यात आले आहे. केंद्रीय आयुष ,आरोग्य ,कुटुंब कल्याण मंत्री प्रतापराव जाधव, पंचायत राज समितीचे राज्याचे अध्यक्ष संजय रायमुलकर यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

## साताऱ्यात चंपाषष्ठीनिमित्त श्री खंडोबाची मिरवणूक संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी** :सातारा येथे चंपाषष्ठी निमित्त श्री खंडोबा मंदिरात आज सकाळी सात वाजता जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, शिवसेना ठकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांच्या उपस्थितीमध्ये महाआरती करून पारंपारिकपणे खंडोबा मूर्तीला पालखीतून मिरवणूक काढत जागीरदार वाड्यात नेण्यात आले. सायंकाळी हीच मूर्ती पुन्हा मंदिरात आणली जाणार आहे. यावेळी मंदिर ट्रस्टी व मान्यवरांच्या उपस्थितीत यात्रेला सुरुवात झाली. तळी भंडारा उचलण्यात आला. शनिवारी सकाळपासून मंदिरात भक्तांची दर्शनासाठी गर्दी होती. महानगरपालिकेतर्फे मंदिराच्या परिसरात फवारणी करण्यात आली व या ठिकाणी आरोग्य कॅम्प सुद्धा लावण्यात आला आहे. या मिरवणुकीला जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्यासह शिवसेना ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे, नंदकुमार घोडेले, मनपा आरोग्य विभाग कर्मचारी अर्चना राणे, समाजसेवक अन्वर शेख, सातारा पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक संग्राम ताठे यांची उपस्थिती होती. यावेळी मंदिर परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त हे लावण्यात आला होता.

## उदगीर येथील दत्त मंदिर येथे ८ डिसेंबरपासून श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

**उदगीर/प्रतिनिधी** : येथील सर्वोदय सोसायटी मधील श्री दत्त मंदिर संस्थान, श्री सिध्दसिंहासन पीठ–श्रीमद सदगुरू श्री. गुंडा महाराज सिध्दरस उदगीरकर भक्त मंडळ उदगीर यांच्या संयुक्त विद्यमानाने रविवार दि. ०८ डिसेंबर २०२४ ते १४ डिसेंबर २०२४ पर्यंत श्रीमत भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जगाचे उद्धारक

## प्रा.डॉ.हर्षानंद खोब्रागडे यांची प्रतिपादन

दैनिक आपला विदर्भ



**बुलढाणा/प्रतिनिधी** : भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान तत्वज्ञानी होते. त्यांनी संपूर्ण माणव जातीच्या उद्धारासाठी कार्य केले. त्यांचे विचार हे भारतदेशापुरतेच नव्हे तर संपूर्ण जगाला तारणारे होते, म्हणून ते खर्या अर्थाने जगाचे उद्धारक होते. असे प्रतिपादन प्रा. डॉ. हर्षानंद खोब्रागडे यांनी केले. ते शासकीय अध्यापक महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिनानिमित्त दि. ६ डिसेंबर रोजी महाअभिवादन कार्यक्रम बोलत होते.

शासकीय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा येथे भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाअभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एन.बी. चव्हाण हे होते. तर,कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. हर्षानंद खोब्रागडे,प्रभारी डॉ.अनिल वरघट,प्रा. डॉ. सुनील खडसे,प्राध्यापक राहुल, एस.हिवाळे, प्रा.भावना काळे,प्रा.प्रेरणा श्रीनाथ, प्रा.अनिल ढगे,प्रा.रवीकिरण मोरे,प्रा.अनिल ढगे,ग्रंथपाल प्रकाश डोंगरदिवे आदींची उपस्थिती होती.

यावेळी बी.एड प्रशिक्षणार्थी आकाश भुसारी,प्रदीप गवळी आणि संजना आराख यांनी आपल्या भाषणातून भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन व कर्तृत्वावर प्रकाश टाकला. विशाल शेगोकार व अभय झनके यांनी भीम गीते सादर केली.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक प्रा.डॉ.हर्षानंद खोब्रागडे हे मार्गदर्शन करताना म्हणाले की,डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संपूर्ण जगाच्या प्रेरणास्थानी असून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी रुजवलेल्या समताधिष्ठित मूल्यांची रुजवणूक करून संवर्धन करावे, असे आवाहन त्यांनी उपस्थितीत प्रशिक्षणार्थी यांना केले. प्रत्येक भावी शिक्षकांनी छत्रपती फुले–शाहू–आंबेडकरी विचारधारा जोपासून शिक्षकाची भूमिका पार पाडावी, प्रत्येकांनी थोर महापुरुष यांच्या विचारांशी पाईक राहून शिक्षणव्यवस्थेत क्रांतिकारी कार्य करून नवराष्ट्र घडवावे, असे त्यांनी प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे आभार कल्पना भुसूम यांनी केले.

## विकसित भारतासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा पासवर्ड आहेत : प्राचार्य डॉ.चव्हाण

महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्राचार्य डॉ.एन.बी.चव्हाण म्हणाले की, विकसित भारतासाठी डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हा पासवर्ड आहे. तो प्रत्येकाने वापरला पाहिजे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण दिनी खऱ्या अर्थाने मानवता ही पोरकी झाली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव होते. ते सर्व क्षेत्रात गाढे अभ्यासक होते. सर्वव्यापी होते. विद्यार्थी युवा वर्गांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श ठेवून जीवन सर्वगुण संपन्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.